॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

क्षमा करणे हा सर्वात
मोठा बदला आहे.

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. ५ नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ११७ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

चेहरे

खेळ खेळतो कुणी
बदलतात मोहरे
वेळेनुसार बदलतात
जगी सारे चेहरे

ऋतू बदलत राहतात
सारखे नसतात वारे
उन्हाळे पावसाळे
अनुभवावे लागतात सारे

SPOT NEWS

२५% अग्निवीर नियमित सैनिक बनणार

● **नवी दिल्ली** – दिवाळीच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने अग्निवीरांसाठी सेवा मुदतवाढ योजना जाहीर करून एक मोठी भेट दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, २५% अग्निवीर नियमित सैनिक म्हणून नियुक्त केले जातील, तर उर्वरित ७५% अग्निवीरांना दोन वर्षांची सेवा मुदतवाढ दिली जाईल. यामुळे या अग्निवीरांचा सेवा कालावधी चार वर्षांवरून सहा वर्षांपर्यंत वाढणार आहे अशी माहिती चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांनी आज दिली. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सीडीएस जनरल एन. एस. राजा सुब्रमणी म्हणाले, १४ जून २०२२ रोजी अग्निपथ योजना सुरू करण्यात आली होती. आजचा दिवस भारतीय संरक्षण दल आणि आपल्या अग्निवीरांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. मंत्रिमंडळाने सर्व अग्निवीरांसाठी भारतीय संरक्षण दलात सामील होण्याचा मार्ग मोकळा केला आहे असेही चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांनी सांगितले.

दुष्काळामुळे यंदा मनसेचा दीपोत्सव रद्द

● **मुंबई** – राज्यातील भीषण दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने यंदाचा शिवाजी पार्कवरील भव्य दीपोत्सव साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बुधवारी एक्स समाज माध्यमातून या निर्णयाची माहिती दिली. यंदाच्या दिवाळीत नागरिकांनीही फटाके फोडणे आणि मोठ्या प्रमाणावर रोषणाई करणे टाळावे, असे आवाहनही ठाकरे यांनी राज्यातील जनतेला केले आहे.

जिल्ह्यातील १८ हजार ९१२ शेतकऱ्यांना १६६ कोटींची कर्जमाफी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६ अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील एकूण १८ हजार ९१२ शेतकऱ्यांना १६६ कोटी ८५ लाख रुपयांचा लाभ प्राप्त झाला आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १४ हजार ९९६ शेतकऱ्यांना ११९ कोटी ८९ लाख रुपये, तर राष्ट्रीयीकृत व व्यापारी बँकांच्या ३ हजार ९१६ शेतकऱ्यांना ४६ कोटी ९६ लाख रुपये असे एकूण १६६ कोटी ८५ लाख रुपये वितरित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी दिली.

अहिल्यानगर जिल्ह्यातील १ लाख ४३ हजार २९३ शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर आतापर्यंत १ हजार ३६९ कोटी ६९ लाख रुपयांची रक्कम जमा करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १ लाख २४ हजार २८६ शेतकऱ्यांच्या खात्यांवर १ हजार १५८ कोटी ७१ लाख रुपये, तर राष्ट्रीय व व्यापारी बँकांमधील १९ हजार ७ शेतकऱ्यांच्या खात्यांवर २१० कोटी ९८ लाख रुपये जमा झाले असल्याचे जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी सांगितले.

या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील आधार प्रमाणीकरणासाठी प्राप्त झालेल्या १ लाख ५८ हजार १८८ शेतकऱ्यांपैकी १ लाख ४६ हजार ८९३ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. हे प्रमाण ९२.८६ टक्के इतके आहे.



या योजनेंतर्गत कर्जाची थकबाकी असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी, तर नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येत आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील एकूण २ लाख ३० हजार १०९ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची माहिती महा–आयटीने विकसित केलेल्या संगणकीय पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे.

योजनेच्या लाभासाठी पात्र शेतकऱ्यांना आपले सरकार सेवा केंद्रामार्फत आधार प्रमाणीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. हे प्रमाणीकरण करताना शेतकऱ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येऊ नये, अशा सूचना संबंधित सेवा केंद्रांना देण्यात आल्या आहेत.

यादीमध्ये नाव समाविष्ट असलेल्या; मात्र अद्याप आधार प्रमाणीकरण पूर्ण न केलेल्या शेतकऱ्यांनी तातडीने ही प्रक्रिया पूर्ण करावी. त्यापूर्वी संबंधित बँक अथवा वित्तीय संस्थेकडे जाऊन दि. ३१ मार्च २०२६ रोजीची थकीत कर्जरक्कम तपासून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

कर्जमाफीसाठी फार्मर आयडी अनिवार्य

■ या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना बायोमेट्रिक पद्धतीने आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. तसेच ग्रीस्टॅक (AgriStack) पोर्टलवर नोंदणी करून फार्मर आयडी (Farmer ID) काढणेही अनिवार्य आहे. त्यामुळे यादीत नाव असलेल्या परंतु आधार प्रमाणीकरण व फार्मर आयडीची प्रक्रिया अपूर्ण असलेल्या शेतकऱ्यांनी आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

देशात ८५० फास्ट-ट्रॅक न्यायालयांची स्थापना होणार

● **नवी दिल्ली । वीरभूमी** –

केंद्र सरकारने बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. यामध्ये लैंगिक शोषण आणि बलात्काराच्या प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी ८५० जलदगती न्यायालये स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, वीज साठवण्यासाठी मंत्रिमंडळाने ९२ गिगावॅट-तास क्षमतेच्या ग्रिड-स्केल ऊर्जा साठवणूक क्षमतेच्या योजनेसाठी १४,५०० कोटी रुपयांच्या योजनेला मंजुरी दिली आहे. याशिवाय, डेटा संकलन प्रणाली अद्ययावत करण्यासाठी ४,३७१ कोटी रुपयांच्या योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. तसेच महत्त्वपूर्ण खनिजांच्या प्रक्रियेसाठीही एका योजनेला मंजुरी देण्यात आली आहे.

अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की ९२ जीडब्ल्यूएच ग्रिड-स्केल ऊर्जा साठवणूक क्षमता योजनेला मंजुरी देण्याचा उद्देश मोठ्या प्रमाणावर वीज साठवणे हा आहे, जेणेकरून गरजेच्या वेळी तिचा वापर करता येईल. यामुळे सौर आणि इतर नवीकरणीय ऊर्जेचा अधिक चांगला उपयोग करता येईल. ते पुढे म्हणाले ऊर्जा साठवणुकीमुळे वीज पारेषण वाहिन्यांच्या क्षमतेचाही अधिक चांगला वापर होईल. उदाहरणार्थ, एखाद्या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी १० मेगावॅटची पारेषण क्षमता निर्माण केली असेल, तर रात्री सौर वीज निर्माण होत नसल्यामुळे तिचा पूर्ण वापर करता येत नाही. मात्र, साठवणुकीची सुविधा असल्यास दिवसा साठवलेली वीज नंतर वापरता येऊ शकते.

मंत्रिमंडळाने महत्त्वपूर्ण खनिजांच्या (क्रिटिकल मिनरल्स) प्रक्रियेच्या योजनेला मंजुरी दिली आहे. याचा उद्देश खाणींमधून काढलेल्या किंवा कच्च्या खनिजांवर अशा प्रकारे प्रक्रिया करणे हा आहे की त्यांचा थेट उत्पादन प्रक्रियेत वापर करता येईल. त्यांनी सांगितले की, ही योजना ओळखण्यात आलेल्या सर्व २४ महत्त्वपूर्ण खनिजांवर लागू होईल. यामध्ये खाणींमधून मिळणा–या खनिजांसोबतच पुनर्वापरातून मिळणा–या खनिजांचाही समावेश आहे.

७३ लाख दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजार अग्रिम मदत जमा

● **मुंबई । वीरभूमी** –

राज्य सरकारने दुष्काळग्रस्त शेतक–यांना दिवाळीपुर्वी ५ हजार अग्रिम मदत देण्याचे घोषित केले होते त्यानुसार आतापर्यंत ७३ लाख शेतक–यांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत. पुढच्या दोन दिवसांत ९५ टक्के शेतक–यांच्या खात्यात पैसे जमा झालेले असतील अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेच्या माध्यमातून आणखी ४ लाख ८६ हजार शेतक–यांच्या खात्यात ४ हजार ७६४ कोटी रूपये जमा करण्यात आले असून, कर्जमुक्ती योजनेअंतर्गत आत्तापर्यंत २१ लाख पात्र शेतक–यांचे १९ हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ झाले असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

आपण स्वत: व मंत्रिमंडळातील इतर सहकारी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या घरी जाऊन दिवाळी साजरी करणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. राज्यमंत्रिमंडळ बैठकीनंतर सह्याद्री अतिथीगृह येथे प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते. दिवाळीपुर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजार रूपये जमा होणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ९५ टक्के शेतक–यांच्या खात्यात पैसे जमा होतील. ५ टक्के खात्यांच्या अडचणीमुळे थोडे मागेपुढे होऊ शकतात. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेच्या माध्यमातून ४ लाख ८६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात ४ हजार ७६४ कोटी रूपये जमा केले आहेत.पूजा करा

सर्वाधिक शेतकरी मराठवाडयातील असून मराठवाड्यातील २ लाख ७६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीचे पैसे जमा झाले आहेत. जवळपास २१ लाख शेतक–यांच्या खात्यात पैसे भरले. १९ हजार कोटी रूपये कर्जमाफी करता जमा केले आहेत. अजूनही याद्यांचे प्रमाणीकरण चालले आहे. ते झाल्यावर या खात्यांमध्ये पैसे जमा करण्याची कार्यवाही सुरू राहील. महायुतीचे सरकार खंबीरपणे शेतक–यांच्या मागे उभे असून विविध योजनांच्या माध्यामतून मदतीचे प्रयत्न करण्यात येत असल्याचेही ते म्हणाले.

'गोकुळ'वर कब्जा करण्यासाठी सहकार कायद्यात दुरुस्ती

गर्दी नियंत्रणासाठी २४ तास कमांड सिस्टीम कार्यान्वित करण्याचे पालकमंत्री विखे पाटील यांचे निर्देश

● **मुंबई । वीरभूमी** –

कोल्हापूर जिल्ह्यातील महत्वाचे सत्ताकेंद्र असलेल्या जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात 'गोकुळ'ची सत्ता काबीज करण्यासाठी सहकार कायद्यात दुरुस्ती करण्याचा निर्णय बुधवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयानुसार राज्यातील ज्या सहकारी संस्थांची वार्षिक उलाढाल ५०० कोटींहून अधिक आहे, अशा संस्थांच्या समित्यांवर सरकारकडून नामनिर्देशित पाच सदस्यांची नियुक्ती केली जाईल. या पाचपैकी चार संचालकांना मतदानाचा अधिकार असेल. महायुती सरकारने हा निर्णय घेऊन काँग्रेस आमदार सतेज पाटील यांना मोठा धक्का दिला असून गोकुळमध्ये महायुतीचा अध्यक्ष निवडून येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मधील कलम ७३अअअ (२) च्या परंतुकामध्ये नवीन परंतुक समाविष्ट करण्यास मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली. त्यानुसार एक सहाय्यक निबंधकाच्या दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी आणि संस्थेच्या कार्याचा अनुभव असलेल्या चार व्यक्तींची संचालक म्हणून नियुक्ती होणार आहे. शासकीय अधिका–याला मताचा अधिकार नसेल. मात्र, इतर चौघांना संचालक मंडळात मताचा अधिकार असणार आहे. पण हे संचालक संस्थेच्या पदाधिकारी पदाच्या निवडणुकीस पात्र राहणार नाहीत.महाराष्ट्र बातम्या

सहकार कायद्यात करण्यात येणाऱ्या या महत्वपूर्ण दुरुस्तीमधून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना वगळण्यात आले आहे. राज्यपालांच्या मान्यतेने यासंदर्भात अधिसूचना लवकरच जारी केली जाईल. या निर्णयाने गोकुळची सत्तासमीकरणे बदलणार असून, संचालक पदाच्या निवडणुकीत झालेल्या उमेदवारांपैकी चार जणांना पुन्हा मागच्या दाराने गोकुळची दारे उघडली जाणार आहेत. गोकुळच्या संचालक पदाची निवडणूक गेल्या महिन्यात पार पडली. २५ जागांसाठी झालेल्या या निवडणुकीत आमदार सतेज पाटील यांच्या गटाचे १३ तर महायुतीचे १२ संचालक निवडून आले. गोकुळच्या अध्यक्ष निवडीसाठी संचालक मंडळाची २९ ऑक्टोबरला बैठक बोलवण्यात आली होती. मात्र, गणपूर्ती अभावी ही बैठक होऊ शकली नाही. महायुतीच्या संचालकांनी या बैठकीकडे पाठ फिरवली होती. बैठकीच्या गणपूर्तीसाठी १४ सदस्यांची उपस्थिती अनिवार्य असते.

महायुतीचे संचालक बैठकीला गैरहजर राहून अध्यक्ष निवडणुकीत बाधा आणत असल्याने सतेज पाटील यांनी न्यायालयात दाद मागितली आहे. न्यायालयाने १० नोव्हेंबर रोजी बैठक घेण्याचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने घाईघाईने सहकार कायद्यात बदल करण्याचा निर्णय घेतला.

शासकीय भागभांडवल, कर्ज हमी, निधी, शासकीय जमीन किंवा रोख अथवा इतर स्वरूपात शासनाचे अर्थसहाय्य असलेल्या व ५०० कोटींहून अधिक वार्षिक उलाढाल असणा–या सहकारी संघांच्या संचालक मंडळामध्ये शासन नामनिर्देशित पाच सदस्यांचा समावेश करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०च्या कलम ७३ अअअ (२) मध्ये सुधारणा करण्यास व त्याबाबत अध्यादेश काढण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या नामनिर्देशित पाच सदस्यांमध्ये एक सहाय्यक निबंधकाच्या दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी आणि अशा संस्थांच्या कार्याचा अनुभव असलेल्या चार व्यक्तींचा समावेश राहणार आहे.



नामनिर्देशित शासकीय अधिकारी सदस्याला मताचा अधिकार नसेल. इतर चार सदस्यांना संचालक मंडळात मताचा अधिकार असेल पण ते या संस्थेच्या पदाधिकारी पदाच्या निवडणुकीस पात्र राहणार नाहीत. अधिनियमातील ही सुधारणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना लागू राहणार नाही. कायद्यातील सध्याच्या तरतुदींनुसार, सहकारी संस्थांच्या संचालक मंडळावर संस्थेने स्वीकृत केलेले २ संचालक आणि २ शासन नामनिर्देशित संचालक नियुक्त करता येतात.

सतेज पाटील संतप्त

■ गोकुळ दूध संघावर ४ स्वीकृत संचालक नेमण्याच्या राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयावर काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. ही लोकशाहीची गळचेपी आहे. साडेपाच लाख शेतकऱ्यांनी आमच्या बाजूने कौल दिलेला आहे. लोकांचा कौल नाकारत असाल, तर रस्त्यावर उतरायची तयारी आम्ही ठेवली असल्याचे सतेज पाटील यांनी सांगितले. सत्तेचे सूत्र असेच राहणार नाही, २०२९ ला ते बदलणार आहे. त्यावेळी सुद्धा आम्ही सगळे लक्षात ठेऊ, असा इशारा सतेज पाटील यांनी दिला.

वीरभूमी

SPOT NEWS

यतीमखाना ट्रस्टच्या वतीने शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांचा सन्मान!

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहमदनगर यतीमखाना ट्रस्ट संचलित अहमदनगर हायस्कूल (मराठी माध्यम) आणि जकरीया आघाडी प्राथमिक शाळेच्या वतीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती संध्या गायकवाड यांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी मा. जिल्हा समाजकल्याण अधिकारी रफिक मुंशी यांच्या हस्ते श्रीमती गायकवाड यांना सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास प्राचार्या मेघना राजेंद्र कुलकर्णी आणि मुख्याध्यापिका शमीम पठाण उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका इशा तांबोळी यांनी केले. याप्रसंगी शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी अहमदनगर यतीमखाना ट्रस्ट संचलित शाळांना सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांमधील आपुलकी, शिस्त, आत्मविश्वास आणि एकमेकांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते पाहून त्यांनी विशेष समाधान व्यक्त केले. वसतिगृहातील वातावरणात विद्यार्थी अत्यंत आनंदाने, मोकळेपणाने आणि एकोप्याने राहत असल्याचे पाहून त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कुराण पठणाचेही त्यांनी विशेष कौतुक केले. आपल्या मनोगतात त्या म्हणाल्या, प्रत्येक मूल हे वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण असते. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष गुण असतात. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील हे गुण ओळखून त्यांना योग्य दिशा द्यावी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवावा. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक घेत असलेले परिश्रम आणि अहमदनगर यतीमखाना ट्रस्टचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान याबद्दल त्यांनी विशेष कौतुक केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील कौशल्याधारित शिक्षण, अनुभवाधारित अध्ययन, सर्जनशीलता आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षणाचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.

सरस्वती विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांची प्रदूषणमुक्त दिवाळीची शपथ

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह आणि प्रकाशाचा सण! मात्र, या आनंदोत्सवात फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण टाळून पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश केडगाव येथील सरस्वती विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी दिला. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर शाळेत 'प्रदूषणमुक्त दिवाळी' हा जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची सामूहिक शपथ घेतली. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना फटाक्यांमुळे निर्माण होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण तसेच त्याचे मानवी आरोग्य, पशुपक्षी आणि पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. फटाक्यांच्या आवाजामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती तसेच पशुपक्ष्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. त्याचबरोबर फटाक्यांच्या धुरामुळे हवेची गुणवत्ता खालावून आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे सण साजरा करताना इतरांच्या आरोग्याचा आणि निसर्गाचा विचार करणे आवश्यक असल्याचे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता दिवे, पणत्या आणि पर्यावरणपूरक सजावटीच्या माध्यमातून दिवाळी साजरी करण्याचा निर्धार केला. तसेच वृक्षांचे संवर्धन करणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अंगीकार करणे, याबाबतही विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक संदीप भोर म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रदूषणमुक्त दिवाळी हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित उपक्रम नसून पर्यावरणाप्रती आपली जबाबदारी ओळखण्याची संधी आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः फटाके न फोडण्याचा संकल्प करण्याबरोबरच आपल्या कुटुंबीयांना आणि परिसरातील नागरिकांनाही पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी प्रेरित करावे. निसर्गाचे रक्षण ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

घोषणांचा पाऊस, शेतकऱ्यांच्या खात्यात ठणठणाट!

आदित्य ठाकरेंचा सरकारवर घणाघात । शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शिवसैनिकांनी खांद्याला खांदा लावून उभे राहावे

● **पारनेर । वीरभूमी –**

राज्यातील शेतकरी अतिवृष्टी, ओला दुष्काळ आणि कोरड्या दुष्काळाच्या संकटात सापडला आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांना केवळ मदतीच्या घोषणा नकोत, तर प्रत्यक्ष आर्थिक मदत त्यांच्या खात्यात जमा झाली पाहिजे. शिवसैनिकांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केले.

पारनेर येथे बुधवारी शेतकरी मदत केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शिवसेना, महिला आघाडी, युवासेना आणि युवतीसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

शेतकरी मदत केंद्राच्या माध्यमातून महिला व पुरुष शेतकरी, शेतमजूर आणि युवा शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्यात येणार आहे. मात्र, हे केंद्र केवळ माहिती गोळा करण्यापुरते मर्यादित न राहता संकटग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळवून देण्यासाठी काम करणार आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आणि प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा करण्यासाठी शिवसैनिकांनी पुढाकार घ्यावा. सरकारची मदत कागदावर किंवा बॅनरवर न राहता शेतकऱ्यांच्या बांधावर आणि बँक खात्यात पोहोचली पाहिजे. मदत प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचते की नाही, याची खातरजमा करून संबंधित अधिकारी, आमदार, खासदार आणि मंत्र्यांना जाब विचारला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मागील वर्षी मुख्यमंत्र्यांनी ३२ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. मात्र, त्यातील किती निधी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाला आणि किती शेतकऱ्यांना लाभ मिळाला, असा सवाल ठाकरे यांनी केला.

अधिवेशनात जाहीर केलेल्या कर्जमाफीबाबतही त्यांनी सरकारला धारेवर धरले. कर्जमाफीसाठी अनेक अटी व शर्ती लादल्या जात असून, केवायसीसह आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झालेले नाहीत. विविध जिल्ह्यांच्या दौऱ्यात शेतकऱ्यांच्या समस्या समोर आल्या असून, सरकारने घोषणांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची मदत देण्याची घोषणा करण्यात आली. मात्र, प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना मदत मिळाली, याचा हिशेब सरकारने द्यावा, असे ठाकरे म्हणाले.

शेतकऱ्यांचे ट्रॅक्टरचे हप्ते थकले आहेत, मुलांच्या शाळा-महाविद्यालयांचे शुल्क भरायचे आहे आणि शेतीसाठी घेतलेले कर्ज फेडायचे आहे. अशा परिस्थितीत पाच हजार रुपयांची मदत पुरेशी आहे का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. नुकसान होऊनही अनेक शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळालेली नसल्याने त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत.

शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असताना सहकारी बँका आणि वित्तीय संस्थांकडून कर्जवसुलीच्या नोटिसा पाठवल्या जात असल्याचा मुद्दा ठाकरे यांनी उपस्थित केला. सरकारने कर्जवसुली थांबवण्याचे आदेश दिले असतानाही शेतकऱ्यांना वसुलीचा तगादा लावला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना कर्जवसुलीच्या नोटिसा देणे अन्यायकारक असून, मुख्यमंत्र्यांनी तातडीने लक्ष घालून कर्जवसुली थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली.

यंदा पावसाळ्यातच दुष्काळाचे संकट उभे राहिले असून, त्याचे परिणाम पुढील वर्षभर ते दीड वर्ष जाणवण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांसमोर पाणी, पीक, जनावरांचा चारा आणि आर्थिक संकट अशी अनेक आव्हाने उभी राहणार आहेत.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना केवळ तात्पुरती मदत करून चालणार नाही, तर सातत्याने त्यांच्या पाठीशी उभे राहावे लागेल. शिवसैनिकांनी गावोगावी मदतकार्य उभे करून शासकीय मदत मिळेपर्यंत पाठपुरावा करावा. शेतकऱ्यांना आधार देणे ही राजकीय जबाबदारीसोबतच सामाजिक बांधिलकी असल्याचे ठाकरे यांनी सांगितले.

यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार सुनील शिंदे, जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, युवासेना जिल्हाप्रमुख निलेश खोडदे, तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, युवासेना तालुकाप्रमुख अनिल शेटे, डॉ. भास्करराव शिरोळे, शिवसेना जिल्हा उपप्रमुख किसनराव सुपेकर, शेतकरी संघटना तालुकाप्रमुख तथा ज्येष्ठ शिवसैनिक गुलाबराव नवले, प्रशांत निंबाळकर, उपतालुकाप्रमुख संदीप मोढवे, शहरप्रमुख संतोष घोरपडे, सतीश म्हस्के आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.

राज्यस्तरीय हिंदी निबंध स्पर्धेत पाअुलबुधे महाविद्यालयाचे यश; मनाली पवार प्रथम, शुभांगी जाधव यांना चौथा क्रमांक!

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या वतीने आयोजित पश्चिम भारत हिंदी राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेत सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. एन. जे. पाअुलबुधे कॉलेज ऑफ एज्युकेशन, अहिल्यानगर येथील विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या मनाली संजय पवार हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर शुभांगी दत्तात्रेय जाधव हिने चतुर्थ क्रमांक मिळवून महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची राज्यस्तरावर छाप उमटवली.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या वतीने पश्चिम भारत हिंदी राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. हिंदी भाषेतील अभिव्यक्ती कौशल्य, विचारांची मांडणी, भाषेवरील प्रभुत्व आणि लेखनातील सर्जनशीलता या गुणांचा कस या स्पर्धेत लागला. त्यामध्ये मनाली संजय पवार हिने आपल्या प्रभावी लेखनाच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळविला. तर शुभांगी दत्तात्रेय जाधव हिने चौथा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

विद्यार्थिनींनी मिळविलेल्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयामध्ये विविध शैक्षणिक व साहित्यिक उपक्रम राबविले जातात. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना आपले भाषा कौशल्य, विचारक्षमता आणि सर्जनशीलता सिद्ध करण्याची संधी मिळते.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विनयनाथ पाअुलबुधे, संस्थेचे संचालक साई पाअुलबुधे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल, सहसचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, तज्ज्ञ संचालक डॉ. रेखा राणी खुराणा, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुचित्रा डावरे, रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप कांबळे, डी.एड. महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा. सविता सानप, डॉ. एन. जे. पाअुलबुधे कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या प्राचार्य डॉ. प्राची मचे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

ठसेकामातून विद्यार्थ्यांनी साकारली आकर्षक भेटकार्डे

रूपलातांडा शाळेत सृजनशील कार्यशाळा । गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान

● **पाथर्डी । वीरभूमी–**

दीपावलीचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रूपलातांडा (धनगरवाडी) येथे विद्यार्थ्यांसाठी ठसेकामातून आकर्षक भेटकार्डे तयार करण्याची एकदिवसीय सृजनशील कार्यशाळा उत्साहात पार पडली. प्रत्यक्ष कृतीतून कलात्मक अनुभव देत विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव देणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता.



कार्यशाळेत शिक्षक जयराम सातपुते आणि दीपा मव्हारे यांनी विद्यार्थ्यांना कांदा, कारले, बटाटा, भेंडी, गाजर, पाने, फुले, कागदाचा बोळा, दोरा, टाकाऊ टूथब्रश आणि अंगठ्याच्या ठशांचा वापर करून विविध नक्षीकाम करण्याचे प्रशिक्षण दिले. या साहित्याच्या कल्पक वापरातून विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी व वैविध्यपूर्ण भेटकार्डे तयार केली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विविध कलांचा अनुभव देणे आणि 'प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण' ही संकल्पना आनंददायी व परिणामकारक बनविणे, हा उपक्रमाचा हेतू होता. शाळेत अशा नाविन्यपूर्ण व कृतीशील उपक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाते.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भेटकार्डांचे प्रदर्शनही भरविण्यात आले. प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी प्राध्यापक प्रदीप राठोड, माजी सरपंच विजय राठोड, उपसरपंच किशोर राठोड, मच्छिंद्र चितळे, अर्जुन चितळे, संजय चव्हाण, रोहिदास राठोड, अशोक राठोड, प्रकाश राठोड, राजू राठोड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी बालचित्रकला स्पर्धेत जिल्हास्तरावर चौथा क्रमांक मिळविणारा आहिल फिरोज पठाण आणि स्पेलिंग पाठांतर स्पर्धेत पाथर्डी तालुक्यात तृतीय क्रमांक मिळविणारी पूर्वी मच्छिंद्र राठोड या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

पटसंख्येअभावी बंद पडण्याच्या मार्गावर असलेल्या रूपलातांडा शाळेतील विद्यार्थिसंख्येत झालेली वाढ आणि विद्यार्थ्यांचे उल्लेखनीय यश पाहून शिक्षणप्रेमी ग्रामस्थ रोहिदास राठोड यांनी शाळेसाठी पाच हजार रुपयांची देणगी जाहीर केली. पाथर्डीचे गटशिक्षणाधिकारी सचिन राख यांनीही गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

चेहऱ्याच्या गंभीर फ्रॅक्चरवर तीन यशस्वी शस्त्रक्रिया; डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलमध्ये रुग्णांना नवा दिलासा!

जबडा, गाल आणि चेहऱ्याच्या हाडांच्या गुंतागुंतीच्या फ्रॅक्चरवर आधुनिक ORIF तंत्राद्वारे उपचार । आयुष्मान भारत योजनेतून तिन्ही रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

चेहऱ्याला झालेली गंभीर दुखापत ही केवळ बाह्य स्वरूपापुरती मर्यादित नसते. अशा दुखापतींमुळे बोलणे, अन्न चावणे, जबड्याची हालचाल आणि चेहऱ्याच्या नैसर्गिक रचनेवरही परिणाम होऊ शकतो. अशाच गुंतागुंतीच्या दुखापतींवर मात करण्यासाठी डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल व वैद्यकीय महाविद्यालय, अहिल्यानगर येथील प्लास्टिक सर्जरी विभागाने तीन रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया केल्या आहेत. विशेष म्हणजे, या तिन्ही रुग्णांना आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचारांचा लाभ मिळाला.

या तीन रुग्णांच्या दुखापतींचे स्वरूप वेगवेगळे होते. पहिल्या रुग्णाच्या चेहऱ्याच्या उजव्या बाजूच्या वरच्या जबड्याचे (Maxilla), खालच्या जबड्याचे (Mandible) आणि गालाच्या हाडाचे (Zygomatic Bone) फ्रॅक्चर झाले होते. दुसऱ्या रुग्णाच्या खालच्या जबड्याचे, तर तिसऱ्या रुग्णाच्या गालाच्या हाडाचे फ्रॅक्चर झाले होते. प्रत्येक रुग्णाच्या दुखापतीचे स्वरूप, हाडांची स्थिती आणि संभाव्य गुंतागुंत लक्षात घेऊन डॉक्टरांनी स्वतंत्र शस्त्रक्रिया नियोजन केले.

चेहऱ्याचा नैसर्गिक आकार आणि जबड्याची कार्यक्षमता टिकवण्यावर भर

या शस्त्रक्रियांसाठी ORIF



(Open Reduction and Internal Fixation) या आधुनिक पद्धतीचा वापर करण्यात आला. या तंत्रामध्ये फ्रॅक्चर झालेली हाडे योग्य स्थितीत आणून विशेष वैद्यकीय प्लेट्स आणि स्क्रूच्या साहाय्याने स्थिर केली जातात. यामुळे हाडांची योग्य जुळणी होण्यास मदत होते. चेहऱ्याची नैसर्गिक रचना, दातांची जुळणी आणि जबड्याची कार्यक्षमता पुनर्स्थापित करण्याच्या दृष्टीने ही उपचारपद्धती महत्त्वाची ठरते.

प्लास्टिक सर्जरी विभागाचे प्रमुख डॉ. अजित काळे, तसेच डॉ. धीरज जुमडे आणि डॉ. अश्विन वानखेडे यांनी या शस्त्रक्रियांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. चेहऱ्याच्या विविध हाडांना झालेल्या दुखापतींवर अचूक उपचार करताना वैद्यकीय कौशल्यासोबतच सूक्ष्म शस्त्रक्रिया नियोजनाची आवश्यकता असते. डॉक्टरांच्या समन्वयातून तिन्ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या.

महागड्या उपचारांचा आर्थिक भार टळला

चेहऱ्याच्या हाडांच्या गुंतागुंतीच्या फ्रॅक्चरवर शस्त्रक्रिया करताना विशेष उपकरणे, वैद्यकीय साहित्य आणि तज्ज्ञ डॉक्टरांची आवश्यकता असते. मात्र, या तिन्ही रुग्णांवर आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून पूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यामुळे रुग्णांना आवश्यक आधुनिक उपचार मिळण्याबरोबरच उपचारांच्या खर्चातूनही दिलासा मिळाला.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनचे अध्यक्ष नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकाराने आणि वैद्यकीय संचालक डॉ. अभिजीत दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयात विशेष वैद्यकीय सेवांच्या बळकटीकरणावर भर दिला जात आहे.

चेहऱ्याच्या गंभीर दुखापतींवर अत्याधुनिक शस्त्रक्रिया सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणे ही अहिल्यानगर आणि परिसरातील रुग्णांसाठी दिलासादायक बाब आहे. प्लास्टिक सर्जरी विभागाच्या या यशस्वी शस्त्रक्रियांमुळे गुंतागुंतीच्या चेहऱ्याच्या फ्रॅक्चरवरील तज्ज्ञ उपचार रुग्णालयात उपलब्ध असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

पै. नाना डोंगरे यांना दादासाहेब फाळके जयंतीनिमित्त सन्मान कलावंतांचा पुरस्कार

● अहिल्यानगर । वीरभूमी –

सामाजिक क्षेत्रात सातत्याने विविध विधायक उपक्रम राबवून ग्रामीण विकासासाठी योगदान देणारे अहिल्यानगरचे सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके जयंतीनिमित्त दिला जाणारा सन्मान कलावंतांचा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. नाशिक येथे आयोजित कार्यक्रमात अभिनेत्री शिल्पा शाहीर यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. कलावंत विचार मंच, नाशिक आणि कमल फिल्म प्रोडक्शन, कमल म्युझिक मराठी यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. म.सा. नाट्यगृह, पंडित नेहरू गार्डन, शालिमार, नाशिक येथे झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवयित्री जयश्री वाघ होत्या. यावेळी स्वागताध्यक्ष सुनील मोफ्लढे, अभिनेत्री श्रुती देशमुख, कवी संजय आहेर, आनंदा साळवे, शाहीर सुनील चिंचोळीकर आदी उपस्थित होते. पै. नाना डोंगरे हे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष असून ग्रामपंचायत सदस्य म्हणूनही कार्यरत आहेत. नगर तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, साहित्यिक आणि धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, स्वच्छता अभियान, जलसंधारण जनजागृती, रक्तदान शिबिरे, मतदार जनजागृती, महिला सक्षमीकरण आणि स्त्री जन्माचे स्वागत अशा विविध उपक्रमांतून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. ग्रामीण युवक व महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांनी आठ राज्यस्तरीय काव्य संमेलने आणि सहा ग्रामीण मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत. त्यांच्या या बहुआयामी सामाजिक आणि साहित्यिक कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याबद्दल पै. नाना डोंगरे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

शहरात पाडव्याला लग्न रेषा माहिती चित्रपटाचे ऑडिशन

● अहिल्यानगर । वीरभूमी –

मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव दूर करून मुलींच्या जन्माचे स्वागत व्हावे, स्त्रीभ्रूणहत्येला आळा बसावा आणि मुलींच्या शिक्षणाबाबत समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हावा, या सामाजिक उद्देशाने 'लग्न रेषा' या माहितीपटाची निर्मिती करण्यात येणार आहे. जय युवा अकॅडमी, क्शन फॉर वेल्फेअर डेव्हलपमेंट असोसिएशन आणि स्वप्नपूर्ती क्रिएशन मूव्ही कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने हा सामाजिक आशयाचा माहितीपट साकारण्यात येत आहे. या माहितीपटासाठी पाडव्याच्या मुहूर्तावर अर्थात ९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून अहिल्यानगरमधील कल्याण रोड येथील जाधव लॉन्स येथे कलाकार निवडीसाठी ऑडिशन घेण्यात येणार आहे. अशी माहिती दिग्दर्शक तुषार रणनवरे, निर्माते प्रा. डॉ. रमेश वाघमारे आणि ॲड. महेश शिंदे यांनी दिली. समाजात आजही काही ठिकाणी मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव केला जात असल्याचे चित्र दिसून येते. विशेषतः काही कुटुंबांमध्ये मुलीच्या जन्माबाबत नकारात्मक मानसिकता असून, मुलगा-मुलगी समानतेचा विचार अद्याप सर्व स्तरांपर्यंत प्रभावीपणे पोहोचलेला नाही. ही मानसिकता बदलण्यासाठी केवळ कायदे आणि नियम पुरेसे नसून समाजाच्या विचारांमध्ये परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे. मुलींच्या जन्माचे आनंदाने स्वागत करणे, स्त्रीभ्रूणहत्या रोखणे, महिलांचे आरोग्य जपणे आणि मुलींना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देणे, या विषयांवर व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत आ. आशुतोष काळेंचा दणदणीत विजय

शेतीपूरक मतदारसंघातून सहकार विकास आघाडीचे उमेदवार विजयी । यशाची परंपरा कायम



राज्यातील सर्वात मोठी असलेली अहमदनगर जिल्हा बँक हि शेतकऱ्यांची बँक आहे. भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध होणे गरजेचे होते. त्यामुळे पुढील दुष्काळी परिस्थितीवर नक्कीच अजून काही प्रभावी उपाययोजना निश्चितपणे करता आल्या असत्या. परंतु आपल्या देशात लोकशाही असल्यामुळे इतर ११ जागा बिनविरोध झाल्या मात्र १० जागांवर एकमत न झाल्यामुळे शेती पूरक मतदार संघाच्या जागेवर शेवटच्या क्षणी निवडणूक लादली गेली. शेतीपूरक मतदार संघात निवडणूक झाल्यास निकाल काय लागणार हे जरी मला माहित होते तरी लोकशाहीचा आदर ठेवून निवडणुकीला सामोरे गेलो. आणि सुज्ञ मतदारांनी त्याचे काम चोख बजावत दणदणीत विजय मिळवून दिला.त्याबद्दल सर्व मतदारांचे तसेच सहकार विकास आघाडीच्या सर्व ज्येष्ठ, श्रेष्ठ नेत्यांचे, कार्यकर्त्यांचे व माझ्या विजयात प्रत्यक्ष,अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या सर्वांचे आभार.

– आ. आशुतोष काळे

● कोपरगाव । वीरभूमी–

आशिया खंडात सहकार क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या व अहिल्यानगर जिल्ह्याच्या ग्रामीण भागाची आर्थिक कामधेनु म्हणून ओळख असलेल्या अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत शेती पूरक मतदार संघातून सहकार विकास आघाडीचे अधिकृत उमेदवार कोपरगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार व सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान चेअरमन आ.आशुतोष काळे यांनी दणदणीत विजय मिळविला आहे.

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत शेतीपूरक मतदार संघातून सहकार विकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असलेले आमदार आशुतोष काळे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता. जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी यावेळी मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल होवूनही अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी शेतीपूरक मतदार संघातून आमदार आशुतोष काळे यांची बिनविरोध निवड होता होता राहिल्यामुळे आमदार आशुतोष काळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीला सामोरे गेले.

निवडणुकीतील विजय जरी त्यांच्या दृष्टीपथात असला तरीपण त्यांनी गाफील न राहता सहकार विकास आघाडीच्या सर्व नेत्यांच्या सहकार्याबरोबरच स्वत:ची यंत्रणा उभी करून प्रत्येक मतदारांपर्यंत ते पोहोचले होते.त्यामुळे पुन्हा एकदा त्यांनी दणदणीत विजय मिळवत २०१७ ला पार पडलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीपासून ते २०१९ असेल किंवा २०२४ ची विधानसभा निवडणूक असेल त्या प्रत्येक निवडणुकीत यश मिळवत जिल्हा बँकेच्या निवडणुकीतही आपली यशाची परंपरा आमदार आशुतोष काळे यांनी कायम ठेवली आहे.

काव्य लेखन स्पर्धेत संदीप रासकर प्रथम, बाळासाहेब देशमुख द्वितीय, रुपचंद शिदोरे तृतीय

● अहिल्यानगर । वीरभूमी –

दुष्काळाची कारणे, त्याचे भीषण परिणाम आणि दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना याविषयी समाजात जनजागृती व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या काव्य लेखन स्पर्धेला जिल्ह्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दुष्काळाच्या वेदना, पाणीटंचाईचे वास्तव आणि जलसंवर्धनाचे महत्त्व कवींनी आपल्या कवितांमधून प्रभावीपणे मांडले. या स्पर्धेत वाघुंडे (ता. पारनेर) येथील संदीप रासकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि पै. नाना डोंगरे व्यायामशाळा, निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नवोदित कवींच्या लेखनकौशल्याला आणि काव्यप्रतिभेला व्यासपीठ मिळावे, तसेच साहित्याच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर जनजागृती व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

स्पर्धेसाठी 'दुष्काळाची कारणे, घ्यावयाची खबरदारी' हा विषय देण्यात आला होता. यामध्ये दुष्काळामागील कारणे, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, पाण्याचे योग्य नियोजन, जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि पाणी बचतीचे महत्त्व अशा विविध विषयांवर कवींनी आपल्या भावना कवितेतून व्यक्त केल्या. जिल्ह्यातील अनेक कवींनी सहभाग नोंदवित दर्जेदार कविता सादर केल्या.

या स्पर्धेत संदीप रासकर (वाघुंडे, ता. पारनेर) यांनी प्रथम क्रमांक, त्र्यंबकराव ऊर्फ बाळासाहेब देशमुख (केडगाव) यांनी द्वितीय क्रमांक, तर रुपचंद शिदोरे (पाथर्डी) यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. उत्तेजनार्थ पारितोषिकासाठी अहिल्यानगर येथील धोंडीराम खांडेकर यांची निवड करण्यात आली. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना राज्यस्तरीय नवव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलन २०२६ मध्ये अनुक्रमे एक हजार, पाचशे आणि तीनशे रुपये रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेची माहिती संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी दिली.

पारनेरमध्ये बँकेच्या जागेवर अनधिकृत फटाका स्टॉल

परवानगी देऊ नये । सैनिक सहकारी बँकेची नगरपंचायतीकडे लेखी मागणी

● पारनेर । वीरभूमी–



पारनेर शहरात दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फटाका स्टॉल उभारण्यावरून वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. पारनेर तालुका सैनिक सहकारी बँकेच्या मालकीच्या जागेवर बँकेची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता फटाका स्टॉल उभारण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या अनधिकृत स्टॉलला कोणत्याही परिस्थितीत परवानगी देऊ नये, अशी लेखी मागणी बँकेने पारनेर नगरपंचायत प्रशासनाकडे केली आहे. त्यामुळे आता नगरपंचायत प्रशासन याबाबत काय भूमिका घेते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे. यासंदर्भात पारनेर तालुका सैनिक सहकारी बँक लि., पारनेर यांच्या वतीने २८ ऑक्टोबर २०२६ रोजी नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी प्रियांका शिंदे यांना अधिकृत पत्र देण्यात आले आहे. या पत्रात मौजे पारनेर येथील गट क्रमांक १३ मधील १५ आर क्षेत्राची जागा बँकेच्या मालकीची असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

बँकेच्या निदर्शनास आलेल्या माहितीनुसार, या जागेवर काही अज्ञात व्यक्तींनी फटाका विक्रीसाठी स्टॉल उभारला आहे. मात्र, संबंधित व्यक्तींनी स्टॉल उभारण्यापूर्वी बँकेकडून कोणतीही लेखी अथवा अधिकृत परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे बँकेच्या मालकीच्या जागेचा अनधिकृत वापर होत असल्याचा आक्षेप बँकेने आपल्या पत्रातून नोंदविला आहे. फटाका विक्री हा ज्वलनशील आणि संभाव्य धोकादायक व्यवसाय असल्याने अशा स्टॉलसाठी जागेची अधिकृत परवानगी, अग्निसुरक्षेच्या उपाययोजना तसेच संबंधित विभागांच्या नियमांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः लोकवस्तीच्या परिसरात फटाका स्टॉल उभारताना सुरक्षिततेच्या नियमांकडे दुर्लक्ष झाल्यास दुर्घटनेचा धोका निर्माण होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर बँकेच्या मालकीच्या जागेवर उभारण्यात आलेल्या स्टॉलला नगरपंचायतीने कोणत्याही प्रकारची परवानगी देऊ नये, अशी ठाम भूमिका बँकेने घेतली आहे. तसेच या प्रकरणाची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, बँकेच्या तक्रारीनंतर नगरपंचायत प्रशासन संबंधित जागेची प्रत्यक्ष पाहणी करणार का आणि अनधिकृत स्टॉलप्रकरणी काय निर्णय घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. फटाका विक्रीच्या परवानगीसोबतच जागेच्या मालकीचा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आल्याने या प्रकरणाची चर्चा पारनेर शहरात सुरू झाली आहे.

शेतमजुरांना २५ हजारांची तातडीने मदत द्या!

शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये देण्याचीही मागणी । भाकपचे ॲड. सुभाष लांडे यांचे तहसीलदारांना निवेदन

● शेवगाव । वीरभूमी–

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत दिली आहे. मात्र, शेतीवर अवलंबून असलेल्या शेतमजुरांना कोणतीही मदत मिळालेली नाही. त्यामुळे शेतमजुरांना किमान २५ हजार रुपयांची तातडीने मदत द्यावी, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी ॲड. सुभाष लांडे यांनी केली.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर लाल बावटा शेतमजूर युनियन महाराष्ट्र (संलग्न भारतीय खेत मजूर युनियन), भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि किसान सभेच्या वतीने ॲड. लांडे यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि. ४) शेवगावचे तहसीलदार आकाश दहाडदे यांना शेतकरी व शेतमजुरांच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

ॲड. सुभाष लांडे म्हणाले, शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत मिळाली; मात्र शेतीवर काम करणाऱ्या शेतमजुरांना मदत न मिळाल्याने त्यांची मोठी आर्थिक अडचण झाली आहे. त्यामुळे शेतमजुरांना तातडीने आर्थिक मदत देणे गरजेचे आहे.

शेतमजुरांसाठी रोजगार हमीची कामे सुरू करून ७०० रुपये रोजाने मजुरी द्यावी, शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये तातडीने मदत द्यावी, तसेच जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करून पाण्याची व्यवस्था करावी, अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

यावेळी भाकपचे तालुका सेक्रेटरी कॉम्रेड संदीप भाऊसाहेब इथापे, लाल बावटा शेतमजूर युनियनचे तालुका सेक्रेटरी कॉम्रेड भिवा घोरपडे, किसान सभेचे कॉम्रेड बापूराव राशिनकर, कॉम्रेड भगवानराव गायकवाड, कॉम्रेड बबनराव पवार, कॉम्रेड दत्ता आरे, कॉम्रेड रामभाऊ लांडे, कॉम्रेड विष्णू गोरे, कॉम्रेड शंकर देवढे, कॉम्रेड गोरक्ष काकडे, कॉम्रेड अब्बास शेख, कॉम्रेड बाबूलाल सय्यद, किसन शेळके, तुकाराम आहेर यांच्यासह शेतकरी व शेतमजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

वीरभूमी

जिल्हा बँकेत सहकार पॅनलचे वर्चस्व; लंके, ढाकणे, काकडे चर्चेत!

लंके यांचा विजय, ढाकणे-काकडे यांना मिळालेल्या मतांनी प्रस्थापित नेतृत्वापुढे आत्मपरीक्षणाचे आव्हान । सहकार निवडणुकीत राजकीय ताकदीचीही कसोटी!

● **पाथर्डी । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २१ संचालकपदांसाठी नुकतीच पार पडलेली निवडणूक केवळ संचालक निवडीपुरती मर्यादित राहिली नाही, तर तिने जिल्ह्याच्या सहकार आणि राजकारणातील अनेक समीकरणांना नव्याने उजाळा दिला आहे. एकूण २१ जागांपैकी ११ जागा बिनविरोध झाल्या, तर उर्वरित १० जागांसाठी प्रत्यक्ष मतदानाची लढत झाली. सहकार क्षेत्रातील दिग्गज नेत्यांच्या नेतृत्वाखालील सहकार पॅनलने निर्विवाद बहुमत मिळविले असले, तरी निकालानंतर जिल्हाभरात सर्वाधिक चर्चा खासदार नीलेश लंके यांच्या विजयाची, केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तथा युवा नेते ऋषिकेश ढाकणे आणि हर्षदाताई काकडे यांना मिळालेल्या लक्षणीय मतांची रंगली आहे.

या निवडणुकीत सहकार पॅनलने आपले वर्चस्व सिद्ध केले, हे निर्विवाद वास्तव आहे. मात्र, निकालाचे राजकीय आणि सामाजिक पातळीवर विश्लेषण केले असता, काही निकालांनी प्रस्थापित नेतृत्वाला निश्चितच विचार करण्यास भाग पाडले आहे. विशेषतः खासदार नीलेश लंके यांनी पारनेर सोसायटी मतदारसंघातून मिळविलेला विजय त्यांच्या राजकीय जनसंपर्काचा आणि सहकार क्षेत्रातील प्रभावाचा महत्त्वपूर्ण संकेत मानला जात आहे. दुसरीकडे, ऋषिकेश ढाकणे आणि हर्षदाताई काकडे यांना मिळालेली लक्षणीय मते ही केवळ पराभवाची आकडेवारी नसून, त्यांच्या राजकीय वाटचालीतील वाढत्या स्वीकारार्हतेची नोंद घेण्यास भाग पाडणारी आहेत.

'बँकेत राजकीय जोडे नको' या भूमिकेचे वास्तव काय?

सहकारी संस्थांमध्ये राजकारण आणू नये, सहकार क्षेत्राला राजकीय संघर्षापासून दूर ठेवावे आणि बँकेच्या निवडणुका बिनविरोध व्हाव्यात, अशा आदर्शवादी भूमिका अनेकदा मांडल्या जातात. वरकरणी या भूमिका सहकाराच्या मूळ तत्त्वांना साजेशा वाटतात. मात्र, प्रत्यक्ष निवडणुकीच्या प्रक्रियेत उमेदवारी, मतदारसंघांची जुळवाजुळव, राजकीय पाठबळ, गटबाजी आणि उमेदवारांची निवड यामध्ये राजकीय समीकरणे प्रभावी ठरत असल्याचे चित्र दिसून आले.

त्यामुळे 'सहकारात राजकीय जोडे नकोत' ही भूमिका नेमकी सहकाराच्या हितासाठी होती की राजकीय सोयीसाठी, असा प्रश्न या निवडणुकीनंतर उपस्थित होत आहे. बिनविरोध निवडणुकीच्या चर्चेतून अनेक राजकीय समीकरणे जुळविली गेली. त्यामध्ये सहकारी संस्था, राजकीय अस्तित्व, समर्थक गट आणि परस्पर हितसंबंध यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. अर्थात, बिनविरोध निवडणूक होणे चुकीचे नाही; मात्र लोकशाहीतील निवडीचा पर्यायच संपुष्टात येऊ नये, ही सभासदांची अपेक्षा असते.

ऋषिकेश ढाकणे यांच्या पहिल्याच निवडणुकीने वेधले लक्ष!

या संपूर्ण निवडणुकीतील सर्वाधिक लक्षवेधी बाब म्हणजे युवा नेते ऋषिकेश ढाकणे यांची कामगिरी. सहकार क्षेत्रातील प्रस्थापित आणि राजकीयदृष्ट्या भक्कम पाठबळ असलेल्या दिग्गज उमेदवारांसमोर ढाकणे यांनी पहिल्यांदाच



निवडणुकीच्या रिंगणात उतरून दिलेली लढत विशेष चर्चेचा विषय ठरली आहे.

केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून सहकार क्षेत्राशी जोडले गेलेले नेतृत्व म्हणून त्यांची ओळख असली, तरी जिल्हा बँकेची निवडणूक ही त्यांच्या राजकीय वाटचालीतील पहिली महत्त्वपूर्ण कसोटी होती. या पहिल्याच निवडणुकीत त्यांनी मिळविलेली मते त्यांच्या मागे उभ्या राहणाऱ्या सभासदांचा आणि नव्या नेतृत्वाकडे पाहण्याच्या बदलत्या दृष्टिकोनाचा संकेत देतात. एखाद्या उमेदवाराचा विजय झाला नाही म्हणून त्याची राजकीय ताकद संपते, असे नसते. उलट, प्रस्थापितांच्या विरोधात मिळालेला मतांचा पाठिंबा भविष्यातील नेतृत्वाची पायाभरणी ठरू शकतो. ढाकणे यांच्या बाबतीत या निकालाचे महत्त्व याच दृष्टिकोनातून पाहिले जात आहे.

हर्षदाताई काकडे यांच्या मतांचीही जिल्हाभर चर्चा!

हर्षदाताई काकडे यांनाही या निवडणुकीत मिळालेल्या लक्षणीय मतांनी जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधून घेतले आहे. सहकार क्षेत्रातील प्रस्थापित नेतृत्वाच्या प्रभावक्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणे सोपे नसते. अशा परिस्थितीत त्यांना मिळालेला मतांचा प्रतिसाद हा त्यांच्या राजकीय संपर्काचा आणि समर्थकांच्या विश्वासाचा महत्त्वपूर्ण भाग मानला जात आहे. या निवडणुकीने महिला नेतृत्वाच्या राजकीय सहभागालाही चर्चेच्या केंद्रस्थानी आणले आहे.

दिग्गजांचे बहुमत; नव्या नेतृत्वाचा वाढता प्रभाव!

या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सहकार क्षेत्रातील अनुभवी आणि प्रस्थापित नेत्यांनी एकत्रित ताकद लावून मिळविलेले बहुमत आणि त्याचवेळी नव्या नेतृत्वाला मिळालेला मतदारांचा प्रतिसाद. एकीकडे अनेक वर्षांच्या राजकीय अनुभवातून उभी राहिलेली संघटनात्मक ताकद, सहकारी संस्थांचे जाळे आणि राजकीय समीकरणे होती; तर दुसरीकडे स्वतंत्र जनसंपर्क, तरुण नेतृत्व आणि बदलत्या राजकीय अपेक्षांचे प्रतिनिधित्व करणारे चेहरे होते.

या पार्श्वभूमीवर लंके यांचा विजय आणि ढाकणे-काकडे यांना मिळालेला मतांचा प्रतिसाद हा प्रस्थापित नेतृत्वासाठी आत्मपरीक्षणाचा विषय ठरू शकतो. केवळ राजकीय वजन, पदे, संस्थांवरील प्रभाव किंवा नेत्यांचे पाठबळ यावरच भविष्यातील निवडणुकांचे गणित अवलंबून राहील, असे आता गृहीत धरता येणार नाही. सभासदांचा विश्वास, स्थानिक पातळीवरील काम, नेतृत्वाची उपलब्धता आणि बदलत्या काळानुसार निर्माण होणाऱ्या अपेक्षा यांनाही तितकेच महत्त्व प्राप्त होत आहे.

अनेक वर्षांनंतर निवडणूक; लोकशाही प्रक्रियेला बळ!

या निवडणुकीकडे केवळ विजय-पराभवाच्या दृष्टिकोनातून पाहणे योग्य ठरणार नाही. अनेक वर्षांनंतर जिल्हा बँकेची निवडणूक प्रत्यक्ष प्रक्रियेतून पार पडली. ११ जागा बिनविरोध झाल्या असल्या, तरी १० जागांसाठी सभासदांना मतदानाचा अधिकार बजावण्याची संधी मिळाली. विरोधकांनी निवडणुकीत सहभाग घेतला आणि निवडणूक प्रक्रिया प्रत्यक्ष मैदानात उतरली, हीदेखील सहकार क्षेत्रातील लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे.

सहकारी बँका या केवळ आर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्था नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. शेतकरी, सेवा सहकारी संस्था, दूध संस्था, विविध कार्यकारी सोसायट्या आणि ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहार यांच्याशी त्यांचे अतूट नाते आहे. त्यामुळे अशा संस्थांच्या निवडणुका पारदर्शक, लोकशाही पद्धतीने आणि सभासदांच्या सक्रिय सहभागातून होणे ही काळाची गरज आहे.

आगामी राजकारणाची नवी समीकरणे?

जिल्हा बँकेच्या या निवडणुकीने एक गोष्ट अधोरेखित केली आहे. सहकारातील सत्ता मिळविणे आणि जनमानसात राजकीय विश्वास निर्माण करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. सहकार पॅनलने बहुमत मिळवून संस्थात्मक वर्चस्व सिद्ध केले असले, तरी लंके, ढाकणे आणि काकडे यांच्या कामगिरीने राजकीय चर्चेला वेगळे वळण दिले आहे.

खासदार नीलेश लंके यांचा विजय, ऋषिकेश ढाकणे यांची पहिल्याच निवडणुकीतील प्रभावी लढत आणि हर्षदाताई काकडे यांना मिळालेला प्रतिसाद या तीन बाबी भविष्यातील जिल्ह्याच्या राजकीय समीकरणांवर कोणता परिणाम घडवतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

अखेर या निवडणुकीने सहकार क्षेत्रातील प्रस्थापित नेतृत्वाचे संघटनात्मक सामर्थ्य दाखवून दिले, तर दुसरीकडे नव्या नेतृत्वाला मिळणारा वाढता प्रतिसादही स्पष्ट केला. त्यामुळे ही निवडणूक सहकार पॅनलच्या विजयापुरती मर्यादित नसून जिल्ह्यातील बदलत्या राजकीय प्रवाहांचे संकेत देणारी ठरली आहे.

बहुमत मिळविणे ही सत्तेची ताकद असते; मात्र विरोधात राहूनही मतदारांचा विश्वास संपादन करणे ही नेतृत्वाची खरी कसोटी असते. जिल्हा बँकेच्या या निवडणुकीने हाच राजकीय संदेश दिला आहे!

अमृतसागर दूध संघाकडून दूध उत्पादकांना दिवाळी भेट

प्रति लिटर एक रुपया विनाकपात रिबेट; सभासदांच्या खात्यात १४ कोटी रुपये वर्ग

● **अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्याची शिखर संस्था असलेल्या अमृतसागर सहकारी दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघाने दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिवाळीनिमित्त प्रति लिटर एक रुपया विनाकपात रिबेट देण्याचा निर्णय घेतला आहे. पंधरवड्याचे दूध पेमेंट, रिबेट, अनामत, वाहतूक ठेकेदारांची बिले, कर्मचाऱ्यांचा बोनस व पगार तसेच अन्य देणी मिळून सुमारे १४ कोटी रुपये बँकेत वर्ग करण्यात आल्याची माहिती माजी आमदार तथा संघाचे चेअरमन वैभवराव पिचड यांनी दिली.

जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदाच्या निवडणुकीत बहुमताने विजयी झाल्याबद्दल संघाचे चेअरमन वैभवराव पिचड



यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर अमृतसागर दूध संघाच्या संचालक मंडळाची मासिक बैठक अकोले येथील संघाच्या सभागृहात झाली. या बैठकीत दूध उत्पादकांना रिबेट देण्याचा निर्णय घेण्यात आला.

बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना पिचड म्हणाले, अमृतसागर दूध संघ वर्षभरात सुमारे ३ कोटी ६० लाख लिटर दूध संकलित करतो. प्रति लिटर एक रुपया रिबेटप्रमाणे सुमारे ३ कोटी ६० लाख रुपये दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येतात.

याशिवाय पंधरवड्याच्या दूध बिलापोटी ७ कोटी २० लाख रुपये, अनामत रक्कम २ कोटी ३२ लाख रुपये, दूध संघ कर्मचाऱ्यांचा बोनस व पगार, तालुक्यांतर्गत व बाह्य दूध वाहतूक ठेकेदारांची बिले आणि अन्य व्यापारी देणी मिळून ८२ लाख रुपये वर्ग करण्यात आले आहेत. अशा प्रकारे एकूण १३ कोटी ९४ लाख रुपये, म्हणजेच सुमारे १४ कोटी रुपये सभासदांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. या रिबेटचा लाभ तालुक्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे.

अकोले तालुक्यात १२६ सहकारी दूध संस्था आणि १५० दूध संकलन केंद्रे असून, त्यांच्यामार्फत दररोज सरासरी एक लाख लिटर दूध संकलित केले जाते, अशी माहिती पिचड यांनी दिली.

बैठकीला संघाचे व्हाईस चेअरमन रावसाहेब वाकचौरे, संचालक आनंदराव वाकचौरे, गोरक्ष मालुंजकर, अप्पासाहेब आवारी, शरदराव चौधरी, रामदास आबरे, जगन देशमुख, अरुण गायकर, गंगाधर नाईकवाडी, सुभाष डोंगरे, बाबुराव बेनके, शिवाजी गायकर, अश्विनी प्रवीण धुमाळ, सुलोचना औटी, दयानंद वैद्य, बाळासाहेब मुंढे आणि कार्यकारी संचालक दादाभाऊ सावंत आदी उपस्थित होते.

उसाला प्रतिटन ५ हजार रुपये दर द्या; अन्यथा कारखान्यांतून साखर बाहेर पडू देणार नाही!

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

महाराष्ट्रातील साखर उद्योगासमोरील विविध प्रश्न, आर्थिक अडचणी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर चर्चा करण्यासाठी केंद्र शासनाने गठीत केलेल्या उच्चस्तरीय समितीची महत्त्वपूर्ण बैठक बुधवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (व्हीएसआय), मांजरी बुद्रुक येथे पार पडली. माजी नीती आयोग सदस्य तथा केंद्रीय उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष डॉ. रमेश चंद यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकरी प्रतिनिधी अभिजीत दादा पोटे यांनी शिवसेनेच्या वतीने सहभागी होत ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि मागण्या आक्रमकपणे मांडल्या.

साखर उद्योगाची सद्यस्थिती, कारखान्यांसमोरील आर्थिक अडचणी, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणारा दर आणि भविष्यातील धोरणात्मक उपाययोजना यांचा अभ्यास करून केंद्र शासनाला अहवाल सादर करण्याची जबाबदारी या समितीवर आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत राज्यातील शेतकरी प्रतिनिधी, साखर कारखाना क्षेत्रातील पदाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी आपापल्या भूमिका मांडल्या.

बैठकीत अभिजीत पोटे यांनी उसाला प्रतिटन ५ हजार रुपये दर मिळावा, साखरेची किमान विक्री किंमत (एमएसपी) प्रतिकिलो ५० ते ५५ रुपये करावी, इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७५ रुपये निश्चित करावा, तसेच साखर कारखान्यांमधील वजनकाटे ऑनलाइन करून वजन प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, अशा प्रमुख मागण्यांवर जोर दिला.

या बैठकीस साखर आयुक्त संजय कोलते, साखर अर्थ विभागाचे आयुक्त यशवंत गिरी, अहिल्यानगर प्रादेशिक साखर संचालक गणेश पुरी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांना राज्य आणि केंद्र स्तरावर वाचा फोडण्यासाठी अभिजीत पोटे यांनी पुढाकार घेतला असून, शेतकऱ्यांच्या मागण्यांवर केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष निर्णय घेण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

'आनंदयात्री'च्या संवेदनशीलतेने उजळली दुष्काळग्रस्तांची दिवाळी

पाथर्डी तालुक्यातील ५०० गरजू कुटुंबांना दिवाळी फराळाचे वाटप

● **पाथर्डी । वीरभूमी–**

दुष्काळाच्या दाहकतेमुळे सणासुदीचा आनंद हरवलेल्या दुर्गम भागातील वंचित कुटुंबांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण फुलविण्यासाठी 'आनंदयात्री फेसबुक परिवार' या सोशल मीडिया समूहाने संवेदनशील उपक्रम राबविला. समूहाचे मुख्य प्रमुख श्री. राम चिंचलिकर आणि सौ. शुभदा ताकभाते यांच्या संकल्पनेतून व आवाहनातून साकारलेल्या या उपक्रमाला समूहाच्या १४ हजार सदस्यांनी सढळ हाताने प्रतिसाद दिला. या मोहिमेतून अल्पावधीत १२० ते १२५ किलो दर्जेदार दिवाळी फराळ संकलित करण्यात आला.

पाथर्डी तालुक्याचे भूमिपुत्र नितीन अदवंत यांच्या विशेष पुढाकाराने पुण्यातील 'आनंदयात्री' मंडळाच्या माध्यमातून त्यांचे स्नेही अविनाश फंड आणि मंदार पाठक यांनी हा फराळ पाथर्डी येथील दलित वस्ती, रांजणी आणि माणिकदौंडी या दुर्गम, डोंगराळ व दुष्काळग्रस्त भागांतील गरीब, पीडित आणि गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचविला. सुबक नियोजनातून तब्बल ५०० कुटुंबांना फराळाच्या पाकिटांचे वाटप करण्यात आले.

या सामाजिक उपक्रमावेळी बंडू बोरुडे, दिगंबर गाडे आणि हुमायून आतार उपस्थित होते.

सोशल मीडिया हे केवळ आभासी संवादाचे माध्यम नसून, त्याच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकाच्या डोळ्यांतील अश्रू पुसता येतात, याचा आदर्श 'आनंदयात्री' समूहाने घालून दिला आहे. गरिबी आणि निसर्गाच्या अवकृपेमुळे दिवाळी साजरी करणेही ज्यांच्यासाठी स्वप्न होते, अशा शेकडो कुटुंबांच्या चेहऱ्यावर फराळामुळे उमललेले हास्य आणि समाधान हीच या उपक्रमाची खरी पावती ठरली.

स्वतःची दिवाळी साजरी करण्यापूर्वी दूरवरच्या बांधवांच्या घरात आनंदाचा दीप प्रज्वलित करणाऱ्या या फेसबुक परिवाराच्या संवेदनशील उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

